# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date: 16 April 2024

## Time: 01.00 to 01.05 PM

## Language Marathi

## **आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

## **प्रादेशिक बातम्या**

## **दिनांक: १६ एप्रिल २०२४ दुपारी १.०० वा.**

****

लोकसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्याच्या मतदानाचा दिवस जसा जसा जवळ येत आहे, तसा प्रचार शिगेला पोहोचला आहे. या टप्प्यात १७ राज्यातल्या १०२ लोकसभा मतदारसंघात मतदान होणार आहे.

भंडारा गोंदिया लोकसभा मतदारसंघाचे महायुतीचे उमेदवार सुनिल मेंढे याच्या प्रचारासाठी तिरोडा शहरात भाजप नेते उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सभा घेतली. भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यावेळी उपस्थित होते.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज बिहारमध्ये गया इथं सभेला संबोधित केलं. पूर्णिया लोकसभा मतदारसंघात ते दुपारी सभा घेणार आहेत. त्यानंतर पंतप्रधान आसाममधल्या गुवाहाटी इथं राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या उमेदवाराच्या प्राचारार्थ सभा घेणार आहेत. काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे आज नागालँडमध्ये दिमापूर इथं जनसभेला संबोधित करतील.

****

लोकसभा निवडणुकीच्या तिसऱ्या टप्प्यासाठी अर्ज दाखल करण्याच्या प्रक्रियेला वेग आला आहे. उमेदवारांना येत्या १९ तारखेपर्यंत अर्ज भरता येतील.

कोल्हापूर मतदारसंघात काँग्रेसचे उमेदवार शाहू महाराज छत्रपती महाविकास आघाडीकडून उमेदवारी अर्ज दाखल  करत आहेत. तत्पूर्वी त्यांनी रॅली काढत जोरदार शक्तिप्रदर्शन केलं.

सांगलीतून अपक्ष उमेदवार विशाल पाटील यांनी शक्तिप्रदर्शन करत अर्ज दाखल केला.

सोलापूर आणि माढा लोकसभा मतदारसंघातून भाजप उमेदवार राम सातपुते आणि रणजितसिंह नाईक निंबाळकर यांनी देखील आज अर्ज भरला. त्यानंतर महायुतीनं रॅली काढून शक्तिप्रदर्शन केलं.

उस्मानाबाद लोकसभा मतदारसंघात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे उमेदवार ओमराजे निंबाळकर, तर रत्नागिरी – सिंधुदुर्ग मतदारसंघात विनायक राऊत आज अर्ज भरतील.

****

लोकसभा निवडणुकीसाठी भारतीय जनता पक्षानं उमेदवारांची बारावी यादी आज जाहीर केली. सातारा लोकसभा मतदारसंघातून माजी खासदार उदयनराजे भोसले यांना उमेदवारी देण्यात आली आहे. याशिवाय पंजाबमधल्या तीन, उत्तर प्रदेशातल्या दोन आणि पश्चिम बंगालमधल्या एका जागेवर पक्षाने उमेदवार जाहीर केले.

****

बीड जिल्हा प्रशासनाच्यावतीनं 'सेल्फी विथ सिग्नेचर' या मतदान जागृती मोहिमेला काल सुरूवात झाली. जास्तीत जास्त नागरिकांनी या उपक्रमात सहभागी होण्याचं आवाहन जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी दीपा मुधोळ मुंडे यांनी केलं आहे.

****

यवतमाळ – वाशिम लोकसभा मतदारसंघात २६ एप्रिलला मतदान होणार असलं, तरीही दिव्यांग आणि ज्येष्ठ नागरीकांचं गृह मतदान घेण्यास सुरुवात झाली आहे. वयाची ८५ वर्षे पूर्ण करणाऱ्या पुसद इथल्या गंगादेवी कान्हू यांनी काल मतदानाचा हक्क बजावला. अशाच पद्धतीने जिल्ह्यातल्या ५३ हजार ज्येष्ठ नागरीकांचं गृह मतदान घेण्यात येणार आहे.

****

२०२४– २५ या आगामी शैक्षणिक वर्षात शिक्षण हक्क अधिनियम – आरटीई अंतर्गत दुर्बल, वंचित, शैक्षणिक आणि सामाजिक दृष्ट्या मागासवर्ग घटकाकरता ऑनलाईन अर्ज भरण्यास आजपासून सुरुवात झाली. शिक्षण संचालनालयानं याबाबतचं परिपत्रक जारी केलं. संबंधित पालकांना येत्या ३० तारखेपर्यंत अर्ज भरता येतील.

****

रामनवमी उद्या साजरी होत असून, शिर्डी इथं रामनवमी उत्सवाला आज सुरूवात झाली. पहाटेच्या काकड आरतीनंतर साई प्रतिमा, विणा आणि पोथीची सवाद्य मिरवणूक काढण्यात आली. तीन दिवस चालणाऱ्या या उत्सवात सहभागी होण्यासाठी शेकडो पायी पालख्या शिर्डीत दाखल झाल्या आहेत.

****

नाशिक शहरात स्वाईन फ्लूचे दोन रुग्ण आढळले असून, सिन्नर तालुक्यात दातली इथल्या एका महिलेचा स्वाइन फ्लूमुळे मृत्यू झाल्याची माहिती, महापालिकेचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. तानाजी चव्हाण यांनी दिली. त्यामुळे आरोग्य यंत्रणा सतर्क झाली आहे. नाशिक शहरातल्या दोन स्वाईन फ्लू बाधित रुग्णांचे नमुने पुण्याच्या राष्ट्रीय विषाणू संशोधन प्रयोगशाळेत पाठवण्यात आले आहेत.

****

बीड जिल्ह्यात गेल्या आठवड्यात झालेल्या अवकाळी पावसामुळे दीड हजार हेक्टरावरील पिकांचं नुकसान झालं. यासंदर्भात केलेल्या पंचनाम्यात वडवणी, धारूर, अंबाजोगाई तालुक्यात सर्वाधिक नुकसान झाल्याचं आढळून आलं आहे. आतापर्यंत ६६ अहवाल प्राप्त झाले असून, शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्यासाठी शासनाकडे अहवाल पाठवला जाईल, असं निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी सांगितलं.

****

नाशिक जिल्ह्यात काल उच्चांकी तापमानाची नोंद झाली असली तरी सायंकाळ नंतर अनेक तालुक्यांमध्ये जोरदार पाऊस झाल्यामुळे शेतपिकांचं मोठ्या प्रमाणात नुकसान झालं. आजपासून पिकांचे पंचनामे सुरू करण्यात येत आहेत.

****

कॅनडा मध्ये टोरन्टो इथं सुरु असलेल्या फिडे बुद्धिबळ स्पर्धेत काल रात्री झालेल्या दहाव्या फेरीत भारताचा डी गुकेश आणि इयान नेपोम्नियाची यांच्यातली लढत अनिर्णित राहीली. तरीही गुणांच्या बळावर गुकेश अव्वल स्थानी आहे.

****